सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय, छत्रपती संभाजीनगर

(महाराष्ट्र शासनाची स्वायत्त संस्था)

स्टेशन रोड, उस्मानपुरा, छत्रपती संभाजीनगर – 431 005 (महाराष्ट्र)

"In Pursuit of Technical Excellence"

- office: (0240) 2366101, 2366102, 2366111

e-mail – office.gcoeaurangabad@dtemaharashtra.gov.in web : www.geca.ac.in

---

**सूचना :**

जा.क्र.शाअमछसं/2023/ 3072

दिनांक : 12/10/2023 13 OCT 2023

विषय :- <u>विद्यार्थ्यांना स्कॉलरशिप व शिक्षण शुल्क सवलती संबंधातील कागदपत्राबाबत सुचना.</u>

शैक्षणीक वर्ष २०२३–२४ मध्ये प्रथम व थेट द्वितिय वर्ष ,पदवी, पदव्युत्तर पदवी, एमसीए तसेच सर्व शाखेत प्रवेश घेतलेल्या अभ्यासक्रमातील सवलत धारक विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज महाडिबीटी पोर्टलवर भरणा करण्याकरीता प्रकिया सुरु झालेले आहे. सबंधीत विद्यार्थ्यांनी अर्ज ऑनलाईन https://mahadbtmahait.gov.in या वेबसाईटवर भरावा. जे विद्यार्थी सवलतीचे अर्ज भरणार नाही, अशांना संपूर्ण शुल्क भरावे लागेल याची नोंद घ्यावी.

| अ.क्र. | प्रवर्ग | अपलोड करावयाची /अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे |
|---|---|---|
| १ | २ | ३ |
| १ | भारत सरकार शिष्यवृती / फ्रिशिप<br>**All B.Tech.& MCA First Year SC/ST/OBC/VJNT/ SBC/ Category**<br><br>**M.Tech. First Year. Only for SC/ST Category** | **शिष्यवृती अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे -**<br>१. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याची पावती.<br>२. शाळा सोडल्याचा दाखला ( एलसी /टीसी ).<br>३. मागील वर्षी उतिर्ण झाल्याचे गुणपत्रक (प्रथम वर्षासाठी १२ वी ची व थेट द्वितिय वर्षासाठी तंत्रनिकेतनातील पदवीका /पदवी उतिर्ण गुणपत्रक )<br>४. कॅप लेटर व ॲडमीशन कन्फर्म झाल्याचे पत्र.<br>५. जात पडताळणी दाखला.(व्यवसायीक अभ्यासकमासाठी आवश्यक )<br>६. जातीचा दाखला.<br>७. उत्पन्नाचा दाखला (सन २०२२–२३ या वर्षाचा )<br>(वडील हयात नसतील तर वडीलाचा मृत्यू प्रमाण पत्र जोडावा आणि आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. ज्या विदयार्थ्यांचे आई /वडील दोन्ही हयात नसतील अशा विदयार्थ्यांनी त्यांच्या सबंधीत पालकाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा. )<br>८. नॉन क्रिमीलिअर (लागु असलेल्या प्रवर्गासाठी )<br>९. शैक्षणीक खंड असल्यास प्रतिज्ञा पत्र.<br>१०. अधिवास प्रमाणपत्र .<br>११. पालक /विद्यार्थी प्रतिज्ञापत्र.<br>१२. रेशन कार्ड<br>१३. आधार काड.<br>१४. आधार सलग्न बॅक खाते कमांक<br>१५. आधार सलग्न मोबाईल क्मांक<br>१६. **M-TECH पदव्युत्तर पदवी** मधील जे विद्यार्थी **एससी व एसटी** प्रवर्गातील आहेत व पालकाचे वार्षीक उत्पन्न **दोन** लाखाच्यावर आहे अशांना फ्रिशिप देय नाही. सन २०१५-१६ पासून फ्रिशिप देय नाही.<br>१७. **OBC/VJNT/SBC Category** या प्रवर्गातील विदयार्थ्यांना स्कॉलरशिप किंवा फ्रिशिप देय नाही. |

| | | |
|---|---|---|
| २ | भारत सरकारशिष्यवृती / फ्रिशिप<br>**All B.Tech.& MCA Second Year to Final Year SC/ST/OBC/VJNT/SBC Category M.Tech. Second Year. Only fo SC/ST** | **ब) शिष्यवृती अर्ज. द्वितिय , तृतिय व अंतिम वर्षातील नुतनीकरण (Renewal ) करणा-या विद्यार्थ्यासाठी.**<br>१. जर तुम्ही शैक्षणिक वर्ष २०२१-२३ मध्ये प्रथम / द्वितिय / तृतिय वर्ष उत्तीर्ण झाला असाल तर तुम्ही शैक्षणीक वर्ष २०२२-२३ साठी खालील पध्दतीने अर्ज करा.<br>२. इडीट बटनावर क्लिक करुन अभ्यासक्रम वर्ष बदलासह इतर आवश्यक बदल करावा.<br>३. टक्केवारी प्रविष्ठ करा.<br>४. गुणपत्रक अपलोड करा.<br>५. द्वितिय तृतीय वर्षाची आवश्यक माहिती भरा.<br>६. प्रवेश घेतल्याची तारीख नोंदवा आणि बोनाफाईड प्रमाणपत्र अपलोड करा.<br>७. शुल्क भरलेले असल्यास त्याची नोंद करा.<br>८. शुल्क भरल्याची पावती अपलोड करा. |
| ३ | राजर्षी छत्रपती शाहू महाराज शिक्षण शुल्क शिष्यवृती योजना आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्यासाठी.<br>**EBC /SEBC/EWS Scholarship**<br><br>**All B.Tech.& MCA First Year to Final Year.** | **शिष्यवृती अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे -**<br>१. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याची पावती.<br>२. शाळा सोडल्याचा दाखला ( एलसी /टीसी ).<br>३. मागील वर्षी उतिर्ण झाल्याचे गुणपत्रक (प्रथम वर्षासाठी १२ वी ची व थेट द्वितिय वर्षासाठी तंत्रनिकेतनातील पदवीका /पदवी उतिर्ण गुणपत्रक )<br>४. कॅप लेटर व ॲडमीशन कन्फर्म झाल्याचे पत्र.<br>५. उत्पन्नाचा दाखला (सन २०२१-२३ या वर्षाचा )<br>( वडील हयात नसतील तर वडीलाचा मृत्यू प्रमाण पत्र जोडावा आणि आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. ज्या विदयार्थ्यांचे आई /वडील दोन्ही हयात नसतील अशा विदयार्थ्यानी त्यांच्या सबंधीत पालकाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा. )<br>६. शैक्षणीक खंड असल्यास प्रतिज्ञा पत्र.<br>७. अधिवास प्रमाणपत्र .<br>८. पालक /विद्यार्थी प्रतिज्ञापत्र.<br>९. रेशन कार्ड<br>१०. आधार कार्ड.<br>११. आधार सलग्न बॅक खाते<br>१२. आधार सलग्न मोबाईल क्मांक<br>१३. कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र |
| ४ | डॉ पंजाबराव देशमुख वसतीगृह निर्वाह भत्ता योजना आर्थीकदृष्टया दुर्बल घटकातील पात्र विद्यार्थ्याच्यासाठी.<br>**EBC /SEBC/EWS Scholarship**<br><br>**All B.Tech.& MCA First Year to Final Year** | **वसतीगृह निर्वाह भत्ता अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे -**<br>१. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याची पावती.<br>२. शाळा सोडल्याचा दाखला ( एलसी /टीसी ).<br>३. मागील वर्षी उतिर्ण झाल्याचे गुणपत्रक (प्रथम वर्षासाठी १२ वी ची व थेट द्वितिय वर्षासाठी तंत्रनिकेतनातील पदवीका /पदवी उतिर्ण गुणपत्रक )<br>४. कॅप लेटर व ॲडमीशन कन्फर्म झाल्याचे पत्र.<br>५. उत्पन्नाचा दाखला (सन २०२१-२३ या वर्षाचा )<br>( वडील हयात नसतील तर वडीलाचा मृत्यू प्रमाण पत्र जोडावा आणि आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. ज्या विदयार्थ्यांचे आई /वडील दोन्ही हयात नसतील अशा विदयार्थ्यानी त्यांच्या सबंधीत पालकाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा. )<br>६. अल्पभुधारक शेतकरी /नोंदणीकृत मजूर असल्याचा सक्षम प्राधिका-यांने दिलेला प्रमाणपत्र<br>७. शैक्षणीक खंड असल्यास प्रतिज्ञापत्र.<br>८. अधिवास प्रमाणपत्र.<br>९. पालक /विद्यार्थी प्रतिज्ञापत्र.<br>१०. रेशन कार्ड<br>११. आधार कार्ड. १२. आधार सलग्न बॅक खाते क्रमांक<br>१३. आधार सलग्न मोबाईल क्रमांक<br>१४. कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र |

| | | |
|---|---|---|
| ५ | **MINORITY SCHOLARSHIP**<br>**अल्पसंख्यांक विद्यार्थ्याकरीता शिष्यवृती (मुस्लीम, बौध्द, ख्रिश्चन, जैन, शीख, पारसी इत्यादी )** | **शिष्यवृती अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -**<br>१.विहित नमुन्यातील अर्ज.<br>२.विद्यार्थ्याचे स्वत:ची स्वाक्षरी असलेली पासपोर्ट आकाराचे छायाचित्र जोडावे.<br>३. विद्यार्थ्याने शालांत परीक्षा व त्यापूढील परीक्षामध्ये प्राप्त केलेले गुण दर्शविणा-या गुणपत्रिकांच्या साक्षांकीत प्रती.<br>४.स्वयंरोजगार असलेल्या पालकांनी उत्पन्नाचे प्रतिज्ञापत्र को-या पेपरवर स्वयप्रमाणित प्रमाणपत्र स्वरुपात सादर करणे आवश्यक आहे.<br>५. नोकरी करणा-या पालकांच्या बाबतीत नियोक्त्याकडून उत्पन्नाचा दाखला प्राप्त करुन घेण्यात यावा. विदयार्थ्याचे पालक उत्पन्न कर भरत असल्याचे आयकर विवरणपत्राची सत्यप्रत देखील उत्पन्नाचा दाखला म्हणून ग्राहय धरण्यात यईल. या प्रमाणपत्रात उल्पसंख्यांक असल्याबदलचा उल्लेखदेखील करण्यात यावा.<br>६.कायम निवासाच्या पत्यासबंधी पुरावा उदा. शिधापत्रिकेची प्रत, विज/दुरध्वनी देयकाची प्रत पारपत्राची प्रत, निवडणूक ओळखपत्राची प्रत इत्यादी. (कोणतेही एक )<br>७.आगाऊ पावतीची प्रत. |
| ६ | **माजी सैनिक / प्राथमीक / माध्यामीक शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांचा मुला/मुलींना मिळणारी सवलत** | **अर्जासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे – ( ऑफलाईन )**<br>१. महाविद्यालयात प्रवेश घेतल्याची पावती.<br>३. शाळा सोडल्याचा दाखला ( एलसी /टीसी ).<br>४. मागील वर्षी उतिर्ण झाल्याचे गुणपत्रक (प्रथम वर्षासाठी १२ वी ची व थेट द्वितिय वर्षासाठी तंत्रनिकेतनातील पदवीका /पदवी उतिर्ण गुणपत्रक )<br>५. कॅप लेटर व ॲडमीशन कन्फर्म झाल्याचे पत्र.<br>६. शिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र<br>७. उत्पन्नाचा दाखला (सन २०२२-२३ या वर्षाचा )<br>( वडील हयात नसतील तर वडीलाचा मृत्यू प्रमाण पत्र जोडावा आणि आईच्या नावे उत्पन्नाचा दाखला जोडणे आवश्यक आहे. ज्या विदयार्थ्यांचे आई /वडील दोन्ही हयात नसतील अशा विदयार्थ्यानी त्यांच्या सबंधीत पालकाचा उत्पन्नाचा दाखला जोडावा. )<br>९. शैक्षणीक खंड असल्यास प्रतिज्ञा पत्र.<br>११. अधिवास प्रमाणपत्र .<br>१२. पालक /विद्यार्थी प्रतिज्ञापत्र.<br>१३. रेशन कार्ड<br>१४. आधार कार्ड.<br>१५. आधार संलग्न बॅक खाते क्रमांक.<br>१६. आधार सलग्न मोबाईल क्रमांक. १७. कुटूंब मर्यादा प्रमाणपत्र |
| ७ | **भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना** | इयत्ता १० वी नतरच्या अभ्यासक्रमांना इयत्ता ११ वी व १२ वी नंतरच्या व्यावसायिक व बिगर व्यवसायिक अभ्यासक्रमाध्ये प्रवेश मिळालेल्या अनुसुचित जाती व नवबौध्द घटकातील विदयार्थ्यांना भोजन, निवास व इतर शैक्षणिक सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी या योजनेचा लाभ शासन स्तरावर शासन निर्णयानुसार देण्यात येते. यासाठी पात्रता कोर्स मध्ये ५० टके गुण मिळणे व बोनाफाईड प्रमाण पत्राची आवश्यकता. पालकाचे उत्नन्न २,५०,०००/- पेक्षा जास्त नसावे. विद्यार्थी स्थानीक रहिवाशी नसावा. उपस्थिती ७५ टक्के आवश्यक राहिल. सदर अर्ज ऑफलाईन भरावे. |
| ८ | **ॲआयसीटीई मार्फत एनएसपी स्कॉलरशिप योजना** | सदर योजना १० वी व १२ वी गुणवत्ता – नि - साधन आधारे विद्यार्थ्यांना शिष्यवृती दिली जाते. सदर योजना अल्पसंख्याक विद्यार्थ्यासाठी सेंट्रलकडून मिळते.<br>**एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा.** |

| | | |
|---|---|---|
| ९ | **अ)प्रगती शिष्यवृत्ती योजना (मुलीसाठी )**<br>**ब)ा सक्षम शिष्यवृत्ती योजना (विशेष दिव्यांग विद्यार्थ्यासाठी)**<br><br>**क) टॉप क्लास शिक्षणासाठी शिष्यवृत्ती योजना** | **अ)प्रगती शिष्यृती योजना** : सदर योजना पदवी वर्गात शिकणा-या विद्यार्थीनीसाठी दिली जाते. उत्पन्न मर्यादा ८ लाखापर्यत. कुटूबातील केवळ दोन मुलीसाठी योजना लागू आहे.<br>**ब) सक्षम शिष्यृती योजना** : सदर योजना पदवी वर्गात शिकणा-या विशेष दिव्यांग विद्यार्थ्यासाठी सक्षम शिष्यृती योजना सुरु केली आहे. उत्पन्न मर्यादा ८ लाखापर्यत. दिव्यांगाचे प्रमाण ४० टक्के किंवा त्यापेक्षा अधिक आसणे आवश्यक आहे.<br>**एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा.**<br>**क) दिव्यांगजन विद्यार्थ्यासाठी - सामाजिक न्याय व सबलीकरण मंत्रालय, भारत सरकार यांच्या मार्फत देय आहे. सदरील शिष्यवृत्तीचा अर्ज पुढील संकेतस्थळावर भरावा.**<br>**www.disabilityaffairs.gov.in** |
| १० | **गेट स्कालरशिप एम. टेक विद्यार्थ्यासाठी** | जे विद्यार्थी एम. टेक. मध्ये प्रवेश घेतले आहे व कॅटॅगिरीनुसार गेट स्कोर धारण करतात अशांना रुपये १२४००/- अेआयसीटीई मार्फत गेट क्वालीफाय विद्यार्थ्यांना स्टायफंड मिळते. उपस्थिती ७५ टक्के आसणे आवश्यक आहे.<br>**एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा.** |
| ११ | **स्वनाथ शिष्यवृती योजना (नॅशनल स्कॉलरशिप पोर्टलवर ) शैक्षणीक वर्ष २०२१-२२ पासून सुरु.** | ज्या विद्यार्थ्याचे आई वडील दोघेही किंवा दोघापैकी एक कोव्हिड-१९ ने मृत्यू पावले आहेत किंवा ज्या विद्यार्थ्याचे पालक सशस्त्र दल आणि केंद्रीय निमलष्करी दलांच्या कारवाईमध्ये शहीद झाले आहेत अशा विद्यार्थ्यांना स्वनाथ शिष्यवृती योजना लागु आहे. तसेच या योजनेकरीता कुटूंबाचे सर्व स्त्रोतामार्फत मिळणारे वार्षिक उत्पन्न रुपये ८ लाखापर्यत निश्चित करण्यात आलेले आहे.<br>**एनएसपी पोर्टलवर विद्यार्थ्यांनी अर्ज भरावा.** |
| १२ | **एंड्रॉस ॲन्ड हॉजर (Endress Houser ) स्कॉलरशिप एम. टेक विद्यार्थ्यासाठी** | जे विद्यार्थी १० वी , १२ वी मध्ये उच्च गुण प्राप्त करतात अशा विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार स्कॉलरशिप मिळते.<br><br>डॉ बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठामार्फत राबविले जाते. |

**टिप** : १.वेळोवेळी दिलेल्या सुचना वाचून त्यानुसार स्कॉलरशिप / फ्रिशिप व सवलतीचे अर्ज ऑनलाईन भरावयाचे आहेत.
२. पीटीसी /एचटीसी व माजी सैनिक पाल्य सवलत हे अर्ज ऑनलाईन भरता येत नाहीत.
३. एकावेळी एकच स्कॉलरशिप /फ्रिशिप किंवा सवलतीसाठी अर्ज करावयाचा आहे.
४. सदरचे अर्ज वेळोवेळी दिलेल्या विहित मुदतीतच ऑनलाईन भरुन सादर करावयाचे आहेत. त्यानंतर आलेले अर्ज स्विकारले जाणार नाहीत. दिलेल्या मुदतीनंतर आलेल्या विदयार्थ्यांना संपूर्ण शुल्क भरावे लागेल याची नोंद घ्यावी.
५. अर्ज भरल्यानंतर एक प्रत डाऊनलोड करुन विद्यार्थी विभागास जमा करावी.

प्राचार्य
शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालय,
छत्रपती संभाजीनगर.

प्रत सर्व सुचना फलकावर लावण्यासाठी.
प्रत प्रोग्रामर यांना संस्थेच्या संकेतस्थळावर अपलोड करण्याकरीता.